# मागास जातींच्या समस्यांवर 'बार्टी'कडून संशोधन : कणसे

पुणे, ता. ८ : "राज्यात विविध जाती-जमाती असून, मागास जातींवर आधारित अभ्यास सुरू आहे. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या समस्या आणि सद्यःस्थितीवर संशोधन करण्यात येत आहे," असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) महासंचालक कैलास कणसे यांनी सांगितले.

संस्थेच्या वतीने राज्यातील होलार समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे संशोधन अहवाल सादर करून त्यावर चर्चासत्र आयोजित केले होते. त्या वेळी कणसे बोलत होते. डॉ. राजू अडागळे यांनी होलार समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा संशोधन अहवाल सादर केला. सविता नलावडे, प्रमोदिनी नाईक, धीरज खाडे, अमर सोनावणे या वेळी उपस्थित होते. कणसे म्हणाले, "होलार समाजावर बार्टीतर्फे संशोधन सुरू असून, या समाजातील नागरिकांनी स्वतःहून पुढे येऊन आपल्या समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे."